REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 8 | MAY - 2018

# शेतीतील जोखीमींचे व्यवस्थापन काळाची गरज



**प्रा. डॉ. वर्षा गंगणे**
एम.बी. पटेल कला—वाणिज्य—विज्ञान महाविद्यालय
देवरी, जिलगा गोंदिया.

## प्रस्तावना :

भारतीय शेतीव्यवस्था आणि शेती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. असे कालपर्यंत समजले जात असे. प्रगतीचे वारे जसजसे वाहू लागले तसतसे शेतीकडून औद्योगीकरणाकडे वाटचाल होऊ लागली. दुय्यम व तृतिय क्षेत्राला अर्थव्यवस्थेत महत्व प्राप्त होऊ लागले. एकेकाळी कृषीवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे अवलंबून असणाऱ्या ९० टक्के लोकसंख्येचे प्रमाण घटून ते ३४ टक्के इतके कमी झाले आहे. शेती व शेती करणाऱ्यांची संख्या कमी होण्याची अनेक कारणे आहेत. जसे वाढते नागरीकरण शिक्षणाचे वाढते प्रमाण, भांडवलाचा अभाव, शेतीविषयक उदासीनता पावसाचा अनियमितपणा, हवामानातील बदल शेती संशोधनाचा अभाव, नविन पिढीचे दुर्लक्ष इत्यादि. पण त्यातील एक महत्वाचे कारण म्हणजे शेतीतील वाढत्या जोखीमी व त्यांच्या व्यवस्थापनाचा अभाव इत्यादी. शेतीउत्पादनातील जोखीमीचे प्रमाण वाढत चालल्यामूळे शेती दिवसेंदिवस मागे पडतांना दिसून येत आहे. एकेकाळी संपन्न व देशाची शान असणारा बळीराजा आत्महत्येचा मार्ग पत्करतो आहे.

शेती करण्याचा दृष्टीकोण बदलला असला तर शेती अजूनही एक किफायतशीर व्यवसाय आहे. व ठरू शकतो. कारण शेतकऱ्यांची आत्महत्या हा आपल्या देशाचा इतिहास नाही. शेतीतील संभाव्य धोके, जोखीमी व शेतीचे नियोजन या बाबी लक्षात घेतल्यास मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती व उत्पादन केवळ शेतीतूनच मिळू शकते. भारतासारख्या अतिलोकसंख्येच्या देशात ते गरजेचे देखील आहे. शेती अर्थव्यवस्थेचा एक अविभाज्य भाग आहे. शेती आणि संबधित उद्योग ज्यामध्ये प्रक्रिया उद्योग शेतीमधून कच्चा माल मिळविणारे उद्योग यांचा नियोजनबद्ध पद्धतीने विकास झाल्यास शेतीमधून मोती पिकविणे अशक्य नाही. शेतकऱ्यांनाही चांगले दिवस बघता येतील असे वातावरण निर्माण होणे कठीण नाही. शेतीचा विकास व पर्यायाने बळीराजाचा विकास करण्यासाठी शेतीमधील जोखीमी कमी करणे गरजेचे आहे. अर्थात शेतीमधिल जोखीमींचे व्यवस्थापन होणे गरजेचे आहे.

## शेतीतील जोखीमींचे प्रकार :

सामान्यत: जोखीमींचे दोन प्रकार दिसून येतात. १) अपेक्षित जोखीमी २) अनपेक्षित जोखीमी.

**१) अपेक्षित जोखीमी** : शेती करतांना काही जोखीमींचे पूर्वानुमान लावता येते. शेतीतील संभाव्य धोके ओळखता येतात. हे धोके कमी करण्यासाठी उपाय योजना किंवा तरतूद देखील करता येते. अशा जोखीमींचा वीमा काढता येतो. अपेक्षित जोखीमींचा वीमा काढता येत असल्यामूळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम मिळू शकते. त्यामूळे बळीराजाचे मानसिक व आर्थिक खच्चीकरण होत नाही किंवा कमी प्रमाणत होते. उदा. बाजारामधील मंदी, स्पर्धा, आग लागणे, कीड लागणे, किटकनाशक फवारणी, मालाला हमी भाव न मिळणे, सिंचन सोयीचा अभाव, माहिती व मार्गदर्शनाचा अभाव, वन्य श्वापदापासून नुकसान, वाढते कर्ज, आत्महत्या, नैराश्य, पिक नियोजनाचा अभाव इत्यादी यापैकी अपेक्षित जोखीमींचा वीमा काढता येतो. त्यामूळे शेतकऱ्याला आर्थिक मोबदला मिळू शकतो.

**२) वीमा अयोग्य जोखीमी** : काही जोखीमींची आगाऊ सूचना मिळत नाही म्हणजेच त्या अनपेक्षित स्वरूपाच्या असतात. या जोखीमींचा निश्चित अंदाज देखील लावता येत नाही. त्यामूळे या जोखीमींचा वीमा देखील उतरविता येत नाही. नैसर्गिक आपत्ती, मंदी यासारख्या जोखीमी अचानक उद्‌भवतात. उदा. हवामानातील बदल, गारपीट, किडींचा प्रादुर्भाव, ओला किंवा कोरडा दुष्काळ, पूर, भूकंप, ज्वालामुखी, मान्सूनचा लहरीपणा इत्यादी या जोखीमींमुळे शेतातील हाताशी आलेली पिके नाहीशी होतात. शेतकरी हवालदिल होणे, नैराश्य आणि आत्महत्या यासारख्या घटना या जोखीमींतूनच घडतात.

**विषयनिवडीची करणे :**

१) शेतीतील जोखीमींचे अध्ययन करणे.
२) शेतीतील जोखीमींचे व्यवस्थापन यांवर प्राकाश टाकणे.
३) जोखीमींच्या व्यवस्थापनासाठी उपाय सूचविणे.
४) नैसर्गिक आपत्ती व उपायांचा आढावा घेणे.

**गृहितके :**

१) शेती क्षेत्रात मोठया प्रमाणात जोखीमी आहेत.
२) शेतीतील जोखीमींचे व्यवस्थापन एक दुर्लक्षित समस्या आहे.
३) जोखीमींमूळे शेतीचे उत्पादन प्रभावित होते.
४) शेतीतील जोखीमी आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या यांचा सहसंबंध आहे.

भारतात शेती हा मुख्य व्यवसाय असला तरी शेती दुर्लक्षित आहे हे वास्तव आहे. नैसर्गिक कारणांमूळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे दाखले अनेक पुराव्यांसह बघायला मिळतात. देशांतील विविध भागात विविध प्रकारच्या नैसर्गिक आपत्तींमूळे पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान होते. राष्ट्रीय नमूना सर्वेक्षणातील एका आकडेवारीनुसार देशातील एकुण शेतकऱ्यांपैकी २.५ एकरपेक्षा कमी क्षेत्र असणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या ७५ टक्के असून त्यांचे दरमहा उत्पन्न ५३४७ रू. आहे. पण शेतीसाठी लागणारा खर्च मात्र ६२२३ रू. इतका आहे. अशा परीस्थितीत नैसर्गिक आपत्ती आल्यास अधिक तोट्यात असलेली शेती कोणतेही आर्थिक उत्पन्न मिळवून देऊ शकत नाही. एकट्या महाराष्ट्राचे उदाहरण घेतल्यास मागील ५ वर्षांपासून मराठवाड्यात पडलेल्या कोरडया दुष्काळामूळे शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. २०१२ पासून विदर्भ–मराठवाड्याला सतत हवामान बदलाचा सामना लागला आहे. अगदी २०१६–१७ या वर्षाचा विचार केल्यास विदर्भ मराठवाडयास सरासराच्या दुप्पट पाऊस झाला. अवघ्या २४ तासात ३०० ते ४०० मि.मी. वृष्टी झाली. २०१४ साली गारपीटीने शेतीचे अतोनात नुकसान झाले. तर २०१७ साली पावसाने दडी मारल्यामुळे पूर्व विदर्भात धानाचे पीक अत्यंत कमी प्रमाणात झाले. कीड आणि सिंचनाअभावी शेतीतील एकूण उत्पादनात मोठी घट झाली. आधिच हवालदील असलेला शेतकरी नैराश्याच्या गर्तेत सापडला. परिणामी शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले. कोकणात देखील हाताशी आलेल्या भातपीकाचे नुकसान झाले.

शेतीविषयक योग्य माहिती व मार्गदर्शनाचा अभाव असल्यामूळे तसेच शेती करतांना जोखीमी व त्यावरील उपाययोजनांचा विचार न करण्यात आल्यामूळे शेतपीकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. नैसर्गिक संकटामुळे केवळ शेतमालांचे नव्हे तर शेतीशी संबधीत असलेल्या, शेतीवर अवलंबून असलेल्या तसेच शेतीतील जोडधंद्यांवर देखील प्रतिकूल परिणाम होतो त्यामुळे शेतकरी पूर्णतः उध्वस्त होतो. शेतीचे योग्य नियोजन व शेतीमधिल जोखीमींचे योग्य व्यवस्थापन केल्यास शेतीचे नुकसान कमी करता येऊ शकेल. तसेच शेतकऱ्यांना मानसिक, आर्थिक व संबोधनात्मक आधार देऊन शेतकऱ्यांना सावरता येईल. त्यासाठी पुढील व्यवस्थापन कार्याचा विचार करणे योग्य ठरले.

**शेतीतील जोखीमींच्या व्यवस्थापनासाठी आवश्यक बाबी :**

शेतीव्यवसायात अपेक्षित यश मिळविण्यासाठी उत्पादनातील जोखीमींचे व्यवस्थापन करणे महत्वाचे असते त्यासाठी खालील मुद्दयांचा विचार करणे महत्वाचे व गरजेचे आहे.

**१) व्यवस्थापनविषयक जागरूकता निर्माण करणे :** शेतकऱ्यांमध्ये शेतीविषयक जोखीमींबाबत जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. शेतीमधील संभाव्य धोके, अडचनी व आपत्ती यासंबधीची पूर्वकल्पना शेतकऱ्यांना देणे व त्यासंबंधी जाणीव निर्माण करणे आवश्यक ठरते. जोखीमीचे व्यवस्थापन व त्याचे स्वरूप याबाबत जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे.

**२) व्यवस्थापन समितीची स्थापना :** शेतीतील जोखीमीचा सामना कसा करायचा. कोणत्या उपाययोजना करता येतील याबाबत व्यवस्थापन समीतीची स्थापना होणे गरजेचे आहे. शेतीपासून २५ कि.मी. च्या परीसरातील शेतकरी तरूण व सामाजीक कार्यकर्त्यांनी या समितीचे सदस्यत्व स्विकारावे व जोखीमींचे स्वरूप, त्यांचे निवारण याविषयी आराखडा तयार करावा. अशाप्रकारे पूर्वतयारीमूळे व्यवस्थापनात अडचणी न येता ते ताबडतोब राबविता येणे शक्य होईल.

**३) व्यवस्थपनाचे स्वरूप निश्चित करणे :** शेतीमधील जोखीमी अनेक प्रकारच्या असू शकतात, पण त्यापैकी महत्वाची जोखीम नैसर्गिक आपत्ती असते. उदा. पूर, दुष्काळ (ओला, कोरडा) हवामान बदल इ. याचा शेवटचा परिणाम म्हणजे शेतकरी कोलमडतो.

अशा परीस्थितीत येणाऱ्या संकटांचा सामना कसा करायचा याचा शेतकऱ्यांना असणे आवश्यक असते. जोखीमीचे व्यवस्थापन कसे करायचे याचे स्वरूप चर्चेतून समोर येत असेल तर शेतकरी कोलमडणार नाही.

**४) मानसिक उद्‌बोधन व मार्गदर्शन** : वर्तमान स्थितीत मानसिक उद्‌बोधनही अत्यंत गरजेची बाब आहे. शेतकऱ्यांचे मानसिक उद्‌बोधन केल्यास त्यांची जोखीमींचा सामना करण्याची हिमंत वाढते. जोखीमी, त्यांचे निवारण, त्यातून मार्गक्रमण व आशावादी दृष्टीकोण याविषयी मार्गदर्शन केल्यास जोखीमींची तिव्रता कमी होऊन शेतकऱ्यास नुकसान रपाई, नंतरच्या पिकांचे नियोजन याबाबत माहिती मिळू शकेल. आज शेतकऱ्याला मानसिक उद्‌बोधनाची गरज आहे हे लक्षात घेऊन उद्‌बोधन व मार्गदर्शन करावे.

**५) जोखीम व्यवस्थापन शिबिरे** : शेतीमधिल जोखीमी व त्यांचा सामना करण्याची तयारी याविषयीची माहिती प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत स्वतंत्रपणे पोहचविणे शक्य नाही. जोखीमीनंतरची कार्यप्रणाली व माहिती त्यांच्यापर्यंत पोहचविण्यासाठी वेळोवेळी शिबिरांचे आयोजन केल्यास त्याचा फायदा शेतकऱ्यांना मिळू शकतो. राज्य, जिल्हा, तालुका व ग्राम स्तरावर अशा शिबिरांचे आयोजन केले जावे.

**६) उत्पादन विविधता** : भारतात बहुसंख्य शेती उदरनिर्वाहाची केली जाते. शेतीत पारंपरिक पिकांचे उत्पादन अधिक प्रमाणात घेतले जाते. नैसर्गिक आपत्तीमूळे पिक हातातून गेल्यास शेतकरी हवालदिल होतो. अशा स्थितीतून बाहेर पडण्यासाठी पिक पद्धतीत बदल करणे आवश्यक असते. हवामानबदलामूळे जोखीमींची सं व्यता लक्षात घेता पिकांची फेररचना करून शेती करणे आवश्यक ठरते. जेणेकरून एक पिक हातातून गेल्यास दुसऱ्या पिकांचे उत्पादन हातात येऊ शकेल.

**७) जोडव्यवसाय** : शेतीसोबत जोडव्यवसाय करणे हा शेतीमधिल जोखीमी कमी करण्याचा उत्तम उपाय होय. शेतकरी आर्थिकदृष्टया सबळ असल्यास तो शेतीपासून परावृत्त होत नाही. चीनमध्ये अशा प्रकारची शेती मोठया प्रमाणात केली जाते. तिला अंगणातली अर्थव्यवस्था असे संबोधले जाते. भारतातदेखील किचन गार्डन, वाडी, परसबाग, या नावांनी या उत्पादनास ओळखले जाते. शेतीसह कुक्कुटपालन, बदकपालन, शेळीपालन, भाजीपाला, फुलबाग, फळउत्पादन, दुग्धव्यवसाय यासारख्या जोडव्यवसायांमूळे शेतीतील जोखीमींचे प्रमाण कमी करता येते.

**८) आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर** : भविष्यकालात वाढत्या स्पर्धेला तोंड देण्यासाठी शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण गरजेचे आहे सध्याचे शेतीचे तंत्रज्ञान जमिनीची मशागत. नांगरणी, कापणी, मळणी, विपणन सर्व पद्धतीत आधानिक तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे आहे. साध्याचे शेतीचे ततशान, मशागत, नांगरणी, कापणी, मळणी, विपणन इत्यादी सर्व पद्धतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास शेती उत्पादनात वाढ घडवन आणता येईल. शासकीय तसेच खाजगी माया शेतीसशिल तंजतानाशाजिकास घडवन आणता येईल. पडित. नापिक झालेल्या जामना सनियमितपणा सिंचन सोयींचा अभाव, शेतीबाबत उदासिनता व शासनाचे दुर्लक्ष इत्यादी कारण शेतीउत्पादनात घट झाली आहे. पर्यायाने शेतीतील जोखीमींचे प्रमाण देखील वाढले आहे.

आधुनिक कालत जमिनीशिवाय इतर माध्यमातून पिक चांगल्या आणि विपूल मात्रेत घेण्याचे तंत्रज्ञान विकसित झाले आहे. जे नेदरलैंड, इस्त्राईल यासारख्या देशात अस्तित्वात आहे. या तंत्रज्ञानाची भारतात आयात करून त्याचा वापर केल्यास शेतीमधिल जोखीमींचे प्रमाण कमी करता

**९) कृषी संशोधन व नवप्रवर्तन** : इतर क्षेत्राप्रमाणे शेतीतही संशोधन होणे गरजेचे आहे. नविन पिकांचा व संकरित वाणांचा शोध, कमी पाण्यावरील पिकांच्या प्रजाती, डुषीउत्पादनाचे नियोजन, पिकपद्धती, पिकांची निवड या मध्ये संशोधन झाल्यास शेतीव्यवसायात देखील जोखीमींचे प्रमाण कमी होऊन स्थिरता निर्माण होईल.

भारतात सध्या प्रचलित असलेले तंत्रज्ञान, ज्यात जमिनीची मशागत, पोत, नांगरणी व इतर शेतीकामे बहुसंख्य ठिकाणी जुन्याच पद्धतीने केली जातात. जागतिक शेती तंत्रज्ञानाचा तुलनेत ते अत्यंत कमी दाचे व अविकसीत आहे. भारतीय शेतकऱ्यांना नविन संशोधन, नविन पिकपद्धती व शेतीबाबत संशोधनात्मक प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. शेतीक्षेत्रात नवनविन शोध लावणाऱ्या शेतकऱ्यांना व अन्यासकांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. ज्यामूळे कृषीउत्पादनात सुधारित पद्धतीने बाड करता येईल व शेतीतील जोखीमी कमी करता येतील.

## सारांश :

शेतीतील उत्पादन वाढविण्यासाठी विविध पातळ्यांवरील जोखीमींचे व्यवस्थापन केल्यास तसेच उत्पादन वाढीसाठी विभिन्न पातळ्यांवर प्रयत्न केल्यास व कृषी उत्पन्न वाढीचे प्रयत्न व नियोजन केल्यास शेतीतील जोखीमी कमी करता येणे शक्य आहे. शेतीतील जोखीमींचे आगाऊ अंदाज लावून त्यादृष्टीने शेतीत बदल केल्यास तसेच शासकीय मदत मिळविण्यासाठी आवश्यक बाबींची तरतूद केल्यास शेतीतील जोखीमींचे प्रमाण बऱ्याच प्रमाणात कमी करता येईल. शेतकरी, शेती व्यवसायी व शेतीसोबत जोडव्यवसाय करणाऱ्यांनी याबाबत जागरूक असणे व सावध असणे आवश्यक आहे.

शेतीतील जोखीमी कमी करण्यासाठी हल्ली खाजगी संस्थादेखील कार्य करतात. जोखानाची बातमी व स्वरूप त्यांच्यापर्यंत पोहचवल्यास शेतकऱ्यांना वेळेवर मदत मिळू शकेल. कृषीउत्पन्न वाढीसाठी अनेक धोरणे व योजना शासनातर्फे राबविल्या जात आहेत. त्यांच्या कार्यपद्धतीत व अंमलबजावणीत सुल ता व सुसुत्रता आणली गेल्यास शेतकऱ्यांना आर्थिक तसेच मानसिक आधार मिळून जोखीमींचे प्रमाण कमी करता येणे शक्य आहे. आपत्कालीन स्थितीत काही सहकारी व खाजगी धैर्यासाठी मानसिक उदबोधन यासारखे उपक्रम राबवितात त्यामध्ये आपत्कालीन शेतकरी सहभागी झाल्यास शेतीतील जोखीमींचे व्यवस्थापन करणे शक्य होऊ शकेल व शेती आवक आश्वासकपणे करता येईल.

## निष्कर्ष :

- भारतात शेतीशी संबधीत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अनेक जोखीमी आहेत.
- जोखीमींचे व्यवस्थापन शास्त्रीय पद्धतीने केले जात नाही.
- शेतीतील जोखीमीबाबत पूर्वसूचना, माहिती व त्यांचा सामना करण्याची पूर्वतयारी दिसून येत नाही.
- जोखीमींचे निवारण करण्यासाठी प्रशिक्षण व मार्गदर्शनाची गावपातळीवर सोय नाही.
- शेतीकडे बघण्याचा दृष्टीकोण सकारत्मक किंवा व्यवसायीक स्वरूपाचा नाही.
- विम्याची व नूकसान रपाईची रक्कम मिळण्यास फार विलंब लागतो त्यामूळे शेतकरी उदासीन असल्याचे दिसून येते. उदा. कर्जमाफीची रक्कम.
- शेतीतील जोखीमीबाबत मार्गदर्शन, शिबीरे, चर्चासत्र इ. गांभिर्याने केले जात नाही.

## शिफारसी :

- शेतकऱ्यांनी शेतीतील जोखीमीबाबत जागरूकता ठेवणे महत्वाचे आहे.
- जोखीमीबाबत अदयावत माहिती व ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न केला जावा.
- कृषी उत्पादन पद्धतीत व पिकांमध्ये विविधता आणली जावे.
- शेतीतील अतिरिक्त उत्पादन क्षमतेचा वापर केला जावा म्हणेजच उपलब्ध साधन सामग्रीचे योग्य व्यवस्थापन करून जास्तीत जास्त वापर केला जावा.
- सामूहिक शेती, सहकारी शेती, गट शेती या पद्धतीने शेती करावी म्हणजे जोखीमींचा भार एकटया शेतकऱ्याला सहन करावा लागत नाही.
- एकात्मिक पीक पद्धतीचा अवलंब करावा या अंतर्गत एकात्मिक किड व व्यवस्थापन आणि एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब केल्यास तुलनात्मक उत्पादन खर्च कमी होईल.
- भांडेतत्वावर (बटई) किंवा करार शेती करावी त्यागळे जोखीमीचे विभाजन होते. तसेच नूकसान भरपाईची विभागणी व तरतूद होऊ शकते. उदा. कांदा, तुर व इतर पिकाची शेती
- शेतमालाला हमीभाव मिळवून दिल्यास व तसे शासकिय प्रयत्न असल्यास शेतीतील जोखामा कमी करता येतील.
- नुकसान भरपाईचा मोबदला मिळविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्राचा शेतकऱ्यांनी करून ठेवावी.
- शेतीसह प्रक्रिया उद्योग, जोडव्यवसाय, स्वयंरोजगार इत्यादी वर भर दिला जावा ज्यामूळे शेतकऱ्याची आर्थिक आवक कायम राहील.
- आपात्कालीन परिस्थितीत काही शासकिय संस्था आपात्कालीन पिक नियोजन पद्धती प्रसारीत करीत असतात त्याप्रमाणे जोखीम कमी करता येऊ शकते.
- शेतकऱ्यांनी आशावादी राहून जोखीमींचा सामना करावा मानसीकदृष्टया खचून न जाता आत्महत्येसारखा मार्ग निवडू नये तसेच जोखीमींचा सामना समर्थपणे करावा.
- शासनाने शेतकऱ्यांचे मनोधैर्य वाढविणारी पावले उचलावीत त्यासाठी संबधीत योजना राबवाव्या.

## संदर्भ :


- लोकसत्ता – सदर – लोकशिवार, १८ नोव्हेंबर २०१७.
- कुरूक्षेत्र – सप्टेंबर २०१७, डिसेंबर २०१९.
- योजना – ऑक्टो. २०१७, डिसेंबर २०१९.

- कृषीभारत – २०१६
- कृषी अहवाल – कृषी अर्थशास्त्र विभाग – नाशिक २०१७.